दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०४२/२०१७-१८
दि.२३/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.प्रदिप दिलीप जंगम, ...............अपिलार्थी
जी-१०, गणेश भवन, नर्मदा नगर,
केबिन रोड, भाईंदर (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
सहा.आयुक्त (परिवहन)

## -: विवेचन :-

श्री.प्रदिप दिलीप जंगम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परिवहन) यांचेकडे दि.१२/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत मनपा परिवहन सेवेत दाखल झालेल्या बसेसची संख्या व त्यांचे आर.सी. बुक सत्यप्रत करुन द्यावेत.
२) एकुण संख्या दाखल झालेबाबत दिनांक व प्रत्येकी आर.सी. बुक प्रती सत्यप्रत करुन देण्यात याव्यात.
३) अवलोकन न देता एकुण शासकीय फी भरण्यास माझी तयारी आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०९/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परिवहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/परिवहन/२४९/२०१८ दि.१८/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परिवहन) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१२/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परिवहन) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.प्रदिप दिलीप जंगम,
जी-१०, गणेश भवन, नर्मदा नगर,
केबिन रोड, भाईंदर (पूर्व).

O/C

२) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (परिवहन)

Received by.
Gaikwad peon
26/3/2018

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन) यांचे कार्यालय.